

# 'बर्ड फ्लू'चा संसर्ग रोखण्यासाठी राज्यात ७० हजार कोंबडय़ा नष्ट

नागपूर : 'बर्ड फ्लू'चा संसर्ग वाढू नये म्हणून राज्यभरात आतापर्यंत बाधित क्षेत्रातील ७२ हजार कोंबडय़ा नष्ट करण्यात आल्या आहेत.

ज्या भागात 'बर्ड फ्लू'चे नमुने सकारात्मक आले त्या भागातील १० किलोमीटर परिसरात तीन महिने पाहणी करून नमुने घेतले जात आहेत. या काळात जर संसर्ग दिसून आला नाही तर हे क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्रातून मुक्त केले जाणार आहे.कोंबडय़ांच्या मृत्यू 'बर्ड फ्लू'ने झाल्याचे स्पष्ट झाल्यावर संबंधित स्थळापासून एक किलोमीटरचा परिसर नियंत्रित क्षेत्र घोषित करून त्या भागातील कोंबडय़ा व इतर पक्षी नष्ट केले जातात. आतापर्यंत ७२ हजार १०६ कोंबडय़ा नष्ट करण्यात आल्याचे पशुसंवर्धन विभागाकडून कळवण्यात आले. नष्ट केलेल्या कोंबडय़ांसाठी शासनाकडून मदत दिली जात आहे.दरम्यान, दोन आठवडय़ांपूर्वी नागपूर जिल्ह्य़ातील बुटीबोरीजळील एका पोल्ट्री फार्ममधील कोंबडय़ांना बर्ड फ्लूची लागण झाली होती. त्यानंतर आतापर्यंत एकही नमुना सकारात्मक आला नाही. जिल्ह्य़ातील साथ आता पूर्णपणे आटोक्यात असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. काणे यांनी सांगितले.

## २०,१९८ विविध पक्ष्यांचा मृत्यू

पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ८ जानेवारीपासून आतापर्यंत २०,१९८ विविध पक्ष्यांचा 'बर्ड फ्लू'मुळे मृत्यू झाला. दोन आठवडय़ापासून यात घट होत आहे. २ फेब्रुवारीला राज्यात सोलापूर (३४), धुळे (८०), अहमदनगर (१६) आणि अकोला (१४) येथे एकूण १४४ कोंबडय़ांचा मृत्यू झाला होता. त्यांचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

# आर. आर. पाटलांच्या भावाचं अजित पवारांकडून कौतुक

पुणे : दिवंगत आर. आर. पाटील हे १२ वर्ष गृहमंत्री होते. त्यांचे सख्खे बंधू सहाय्यक पोलीस आयुक्त राजाराम पाटील हे गृहामंत्र्यांचा भाऊ म्हणून कधीच मिरवले नाहीत. ते अत्यंत संयमी आणि शांत व्यक्ती आहेत, अशा शब्दांमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आर. आर. पाटील यांच्या भावाच्या साध्या रहाणीमानाचं कौतुक पुण्यातील एका कार्यक्रमामध्ये केलं. एखाद्याचा लांबून गृहमंत्री नातेवाईक असला तरी सर्व डिपार्टमेंट चालवत असतो असा संदर्भ यावेळी अजित पवारांनी देताच सभागृहात एकच हशा पिकला. राजाराम पाटील यांनी भाऊ गृहमंत्री असताना देखील वीस वर्षे साईड ब्रँचला काम केलं. राजराम पाटील हे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात दीड वर्ष झालं सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर कार्यरत असून त्यांची नुकतीच बदली झाली आहे. त्यांचा आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तेव्हा, अजित पवार यांनी आर. आर. पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला.



ते, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सेवा उपक्रम, एक्स ट्रॅकर उपक्रम, विविध सोशल मीडिया पेजेस शुभारंभ तसेच स्मार्ट पोलीस ठाणे प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम प्रसंगी अजित पवार बोलत होते. उपमुख्यमंत्री म्हणाले की, सहाय्यक पोलीस आयुक्त राजराम रामराव पाटील त्यांच्या नवाचा शॉर्टफॉर्म देखील आर.आर. पाटील आहे. आर. आर. पाटील आणि आम्ही १९९० पासून एकत्र काम करत होतो. सभागृहात एकाच बेंच वर बसायचो. दुर्दैवाने आर. आर. पाटील लवकर सोडून गेले. ते त्याही वेळेस गृहमंत्री होते. सर्वाधिक १२ वर्ष ते गृहमंत्री राहिले. त्यांनी अनेक चांगले निर्णय घेतले. त्याही वेळेस पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सहाय्यक पोलीस आयुक्त राजराम पाटील हे अधिकारी होते. पण कधी ही ते गृहमंत्र्यांचा भाऊ आहे असे मिरवले नाहीत. ते अत्यंत शांत, संयमी आणि सरळ व्यक्ति आहेत. नाहीतर एखाद्याचा लांबून कोणीतरी नातेवाईक गृहमंत्री असला तरी सर्व डिपार्टमेंट चालवत असतो. राजराम पाटील यांची पोलीस सेवा ही ३३ वर्ष झाली असून स्वतःचा सख्खा भाऊ १२ वर्ष गृहमंत्री असतानाही त्यांनी वीस वर्षे साइड ब्रँचला काम केलं." राजराम पाटील यांना ६५१ बक्षीस, दोन वेळेस राष्ट्रपती पदक मिळाले आहे.

### आर.आर.पाटील यांचे बंधू राजाराम पाटील गहिवरले

पोलीस आयुक्तालयातील प्रत्येकाने मला सहकार्य केले. पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांनी दिलेलं प्रेम मी विसरू शकत नाही. केलेल्या कामाची नोंद इथली जनता घेते. इथल्या सहकारी, नागरिकांचे आभार मानण्यासाठी शब्द नाहीत असे सांगत सहाय्यक पोलीस आयुक्त राजराम पाटील गहिवरलेले पाहायला मिळाले.

### सोशल मिडिया वापरत असताना ध चा मा होऊ देऊ नका

"सोशल मीडिया वापरत असताना ध चा मा होऊ देऊ नका काळजी घ्या. एकदा धनुष्यातून बाण सुटला तो परत काही घेता येत नाही. तसंच सोशल मीडियाच आहे. एका अधिकाऱ्याच्या तोंडून चुकून शब्द गेला. त्यांचं काम चांगलं होतं. पण, त्या शब्दांमुळे त्याला निलंबित करावं लागलं. कुठल्याही परिस्थितीमध्ये तोल जाऊ देऊ नका. कधी कधी माणूस चिडतो. चांगलं काम करत असताना कोणीतरी डोकं तापविण्याचं काम करतो. तिथं डोक्यावर बर्फ ठेवून काम करा," असा सल्ला अजित पवार यांनी पोलिसांना दिला आहे. "तापटपणा काढून टाका हे अजित पवार सांगतोय विचार करा थोडा यावर," अशा शब्दांमध्येही त्यांनी अधिकाऱ्यांना समजावलं आणि सभागृहात हशा पिकला.

# मी तक्रार मंत्री झालोय; माझ्याच खात्याचे आदेश मला बातमीतून कळतात : बच्चू कडू

औरंगाबाद : विधान परिषदेत शिक्षण नव्हे केवळ शिक्षकांचीच चर्चा होते. याला आम्ही राजकारणीच जबाबदार आहोत. मी राज्यमंत्री असताना मंत्र्यांच्या बैठकीत मीच तक्रारी करतो. त्यामुळे मी तक्रार मंत्री झालो आहे. राज्यमंत्र्याला काही अधिकार नाही. त्यामुळे माझ्याच विभागाचे आदेश मला दुसऱ्या दिवशी बातमीतून कळतात, असा नाराजीचा सूर शालेय शिक्षण राज्यमंत्री ओमप्रकाश (बच्चू) कडू यांनी व्यक्त केला.

तापडिया नाट्यमंदिरात गुरुवारी उपक्रमशील शिक्षकांनी एकत्र येऊन सुरू केलेला जिल्हा परिषद लाइव्ह एज्युकेशन ॲप लाँच सोहळा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. 'ई-कट्टा'ने हे ॲप बनवले असून, त्याचे लाँचिंग शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश गोंदवले, विभागीय शिक्षण उपसंचालक अनिल साबळे, शिक्षणाधिकारी सूरजप्रसाद जयस्वाल, जालेंद्र बटुळे, अश्विनी लाटकर, जयश्री चव्हाण, रमेश ठाकूर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कडू पुढे बोलताना म्हणाले, कष्टकऱ्यांच्या मुलांना शिकवण्याचे भाग्य मिळाल्यावर नाकर्तेपणा करणाऱ्या अफजल खानापेक्षा कमी नाही. शैक्षणिक विषमतेची दरी मिटवायची आहे. पूर्वी गावात शिक्षकाशिवाय कोणतेही काम होत नव्हते. त्यांच्याबद्दल प्रचंड धाक, आदरयुक्त भीती होती. तो काळ परत आणण्यासाठी शिक्षकांनी मनावर घेतले पाहिजे.

## डंगऱ्या बैलांवर झूल टाकण्याचा प्रकार नको

त्यासाठी आता काम केले पाहिजे. आज आरोग्य शिक्षणासह सर्वच विभागांची अवस्था वाईट आहे. ती परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा. समजदारीने शिकण्याची आज गरज आहे. काही शाळा सोडल्या, तर खाजगी शाळांकडून जास्तीची वसुली होतेय, त्याला लगाम लावण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

पैसा आल्यावर शिक्षणही बदलते. आता पैसेवाल्यांच्या मुलांना जिल्हा परिषद शाळांचे शिक्षण नकोय. सरपंच, अधिकारी, शिक्षकांची मुलेच जिल्हा परिषदेच्या शाळेत जात नाहीत. आर्थिक दरी एकवेळ परवडेल. मात्र, ही शिक्षणाची विषमता परवडणारी नाही. हे बदलण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. कोरोना काळात गावातील २५ टक्के मुलेही ऑनलाइन आले नाहीत. त्याचा जाब कोण देईल. उगाच डंगऱ्या बैलांवर झूल टाकण्याचा प्रकार नको, असेही राज्यमंत्री कडू म्हणाले.

# पेट्रोल व डिझेल दरवाढ विरोधात उल्हासनगर शिवसेनेच्या वतीने निषेध आंदोलन




उल्हासनगर : - भाजप केंद्र सरकारचा मनमानी कारभार आणि सतत होणारी पेट्रोल व डिझेल दरवाढ या विरोधात उल्हासनगर शिवसेनेच्या वतीने प्रांत ऑफिस समोर तीव्र आंदोलन करण्यात आले.यावेळी शिवसेना कल्याण उपजिल्हा प्रमुख चंद्रकांत बोडारे यांच्या नेतृत्वाखाली शहर प्रमुख राजेंद्र चौधरी व मा.विरोधी पक्षनेते धनंजय बोडारे यांनी बैलगाडी हाकून निषेध व्यक्त केला.यावेळी प्रांत अधिकारी श्री.कारभारी यांना शिवसेनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.या आंदोलनात उल्हासनगरच्या महापौर लिलाबाई आशान,उपशहर प्रमुख राजेंद्र शाहू व संदीप गायकवाड,महिला शहर संघटक मनीषा भानुशाली, उपशहर संघटक स्मिता चिखलकर,नगरसेविका शितल बोडारे,वसुधा बोडारे,ज्योती माने,नगरसेवक अंकुश म्हस्के,सुरेश जाधव,सुरेंद्र सावंत,श्री. बेहनवाल,नगरसेवक व उपशहर प्रमुख अरुण आशान,युवा शहर अधिकारी बाळा श्रीखंडे,ग्राहक संरक्षण कक्ष शहर प्रमुख जयकुमार केणी,विधानसभा अध्यक्ष सागर उटवाल, विभाग प्रमुख श्री जावळे, बापू सावंत,राजू माने,उपविभाग प्रमुख,अनिल मराठे,प्रा.प्रकाश माळी,दिपक साळवी,दशरथ चौधरी, संजय मरसाळे,प्रमोद पांडे,शाखा प्रमुख, उपशाखा प्रमुख, युवा सेना, महिला आघाडी,ग्राहक संरक्षण कक्ष व शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# शासनाच्या निर्देशाशिवाय कारवाई केली तर याद राखा!

## मुख्यमंत्री सचिवालयाचा सेंटर पॉईंट शाळेला इशारा

नागपूर : करोनामुळे आधीच अनेक पालक आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. हे माहीत असूनही शुल्कासाठी पालकांना मानसिक त्रास देणाऱ्या सेंटर पॉईंट शाळा प्रशासनाला मुख्यमंत्री सचिवालयाने शासनाकडून निर्देश येईपर्यंत कुठल्याही शाळेवर कारवाई करू नका, तसे केले तर याद राखा, असा कठोर इशारा दिला आहे.५ फेब्रुवारीपर्यंत शुल्क भरा अन्यथा विद्यार्थ्यांचे ऑनलाईन वर्ग बंद करू, असे पत्र सेंटर पॉईंट शाळेने पालकांना पाठवले. त्यामुळे पालकांमध्ये प्रचंड रोष असून करोनासारख्या जागतिक महामारीमध्येही शाळा पालकांना सातत्याने मानसिक त्रास देत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

यासाठी राष्ट्रीय शिक्षक पालक संघटनेचे योगेश पाथरे यांच्या नेतृत्वात पालकांनी शिक्षण उपसंचालक, जिल्हाधिकारी आणि मुख्यमंत्री सचिवालयाला निवेदन दिले. करोनामुळे पालकांची आर्थिक स्थिती ढासळली असल्याने शाळेचे यावर्षात शुल्कामध्ये सवलत द्यावे, नियमाबाहेरील शुल्क रद्द करावे अशा विविध मागण्या यात केल्या आहेत. याशिवाय पालकांनी याआधी दरवर्षी शाळेमध्ये नियमित शुल्क जमा केले आहेत. यापूर्वी कधीही शुल्कासाठी शाळांना आम्ही साकडे घातले नाहीत. मात्र, यंदा आर्थिक स्थिती ढासळल्याने शाळा प्रशासनाने पालकांचा थोडा विचार करावा, शुल्कामध्ये सवलत द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शासनाकडून कुठलेही निर्देश येईपर्यंत शुल्क वसुलीसाठी तगादा लावल्यास शाळेवर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री सचिवालयातील अधिकाऱ्यांनी पालकांना दिले.

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई

धर्मादाय आयुक्त भवन, २रा मजला, ८३,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८.

**चौकशीची जाहीर नोटीस**

**अर्ज क्रमांक सधआ-10/66/2021**
**सार्वजनिक न्यासाचे नांव - CONTRACT RESOURCES ASIA FOUNDATION बाबत.**
**SHRI RATHINA GUNAVEL RATHINAM - अर्जदार**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **सहाय्यक धर्मादाय आयुक्त, १० बृहन्मुंबई विभाग मुंबई** हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम /१९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत : (वर्णन) **रु. ५००००/-** (अक्षरी :- पन्नास हजार फक्त) (चेक)
(ब) स्थावर मिळकत: (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०३/०२/२०२१** रोजी दिली.

**सही/-**
शिक्का
**अधीक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

### युवराज हायजिन प्रॉडक्टस लिमिटेड

सीआयएनः एल७४९९९एमएच१९९५पीएलसी२२०२५३
नोंदणी. कार्या.: प्लॉट क्र. ए-६५०, १ ला मजला, टिटिसी इंडस्ट्रीयल इस्टेट, एमआयडीसी, पवने व्हिलेज, महापे, नवी मुंबई - ४००७०५
दूरः ०२२ २७७८ ४९९१ ई-मेलः yhpl@hic.in संकेतस्थळःwww.hic.in

**सूचना**

सूचना द्याद्वारे देण्यात येत आहे की सेबी (लिस्टिंग ऑब्लगेशन्स आणि डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ च्या नियम २९ आणि ४७ च्या अनुसार३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्यातिमाही आणि नऊ महिन्यांसाठी कंपनीच्याअलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्ष अन्य बाबींसह विचार करून नोंद पटावर घेण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक शनिवार १३ फेब्रुवारी २०२१ रोजी घेण्यात येणार आहे. सदर माहिती कंपनीचे समभाग जिथे सूचीबद्ध असलेल्या बीएसई लि. (www.bseindia.com) च्यासंकेतस्थळावर आणि कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.hic.in वर देखील उपलब्ध आहे.

युवराज हायजिन प्रॉडक्टस लिमिटेड, करीता
सही/-
विशाल कम्पानी
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः ०३३३५७१७

ठिकाणः नवी मुंबई
दिनांकः ५ फेब्रुवारी २०२१

### MERCURY TRADE LINKS LIMITED

**CIN: L26933MH1985PLC037213**
Registered Office: S-002 B, 2nd Floor, Vikas Centre, S.V. Road, Santacruz (West), Mumbai – 400054

**NOTICE**

In Compliance with Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015, notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Friday, the 12th day of February, 2021 at 2.00 P.M. at Registered Office of the Company, Mumbai inter-alia to approve and take on record the un-audited Financial Results of the Company for the quarter and nine months ended 31st December, 2020.

This information is also available on the website of the Company at www.mercurytradelinks.com and also on the stock exchange websites at www.bseindia.com where shares of the Company are listed.

**For Mercury Trade Links Limited**
**PRACHI VIJAYVARGIYA**
**CS & COMPLIANCE OFFICER**
Place: Mumbai
Date: 5th February, 2021

### EASY FINCORP LIMITED

**CIN: L65920MH1984PLC118029**
**Regd. Off:** c/o: SAREGAMA INDIA LTD, 2nd Floor, Universal Insurance Building, P. M. Road, Fort, Mumbai – 400 001

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations 2015, Notice is hereby given that a Meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Friday, 12th February, 2021 to inter- alia consider and approve the Unaudited Financial Results of the Company for the quarter and nine months ended 31st December, 2020.

**For Easy Fincorp Limited**
**Sd/-**
**Place: Kolkata** **Giriraj Ratan Kothari**
**Date: 05/02/2021** **Company Secretary**

# इंधन दरवाढ विरोधी शिवसेना शिवाजीनगर मानखुर्द विधानसभेच्या वतीने आंदोलन

मुंबई : शिवसेनापक्षप्रमुख तथा मुख्यमंत्री मा. उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून विभाग क्र.८ चे विभागप्रमुख .राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शिवाजीनगर मानखुर्द विधानसभा उपविभागप्रमुख सर्व तात्या सारंग, गणेश नायडू, अख्तर शेख, हेमंत साळवी , शिवसेना नगरसेवक प्रभाग समिती अध्यक्ष श्री.विठ्ठल लोकरे , शिवसेना नगरसेविका सौ.समिक्षाताई सक्रे यांच्या नेतृत्वाखाली इंधन दरवाढ विरोधी केंद्र सरकार विरोधात शिवसेना शिवाजीनगर मानखुर्द विधानसभेच्या वतीने आज दि. ५ फेब्रुवारी शुक्रवार रोजी विरमाता



जिजाबाई भोसले मार्ग, शिवाजीनगर सिग्नल येथे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात महिला उपविभाग संघटिका सौ.प्रज्ञाताई सकपाळ, सौ.राजश्रीताई मोरे , सौ.शारदाताई पालकर, सौ.सुनिताताई वत्रे,विधानसभा संघटिका सौ.किरनताई गावंडे, शबनम ताई शेख, विधानसभा संघटक रमेश कोळी साहेब, सहसंघटक अन्वर सय्यद शाखाप्रमुख सर्वश्री. अर्जुन शिंदे , एकनाथ खराडे, उमाजी साळवी, अभिजीत सावंत, मनोज पाटील, कलाम खान, रोहित यादव, आरीफ सय्यद, युवासेना विभागअधिकारी श्री.गणेश वाव्हळ, विभागअधिकारी किरण म्हस्के, युवती विभाग अधिकारी शायनाज शेख, शाखाधिकारी प्रकाश वाघमारे इतर शाखेचे शाखाधिकारी अधिकारी युवासेना पदाधिकारी सर्व शाखेचे महिला शाखासंघटिका तसेच महिला/पुरुष उपशाखाप्रमुख, गटप्रमुख आजी माजी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने सहभाग घेतला होता.

### INLAND PRINTERS LIMITED

**Reg. Off.:** 800, Sangita Ellipse, Sahakar Road, Vile Parle (East), Mumbai-400057 **Tel.:** (022)-40482500
**Email:** inlandprintersltd@gmail.com
**CIN**: L99999MH1978PLC020739
**Website:**www.inlandprinters.in

**NOTICE**

Notice is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Saturday, 13th February, 2021 inter-alia to consider and approve Un-audited Financial Results for the Quarter ended 31st December, 2020.

The information contained in this notice is also available on the company's website www.inlandprinters.in as also on the website of BSE Ltd www.bseindia.com.

**For Inland Printers Limited**
**Sd/-**
**Meghana Kashte**
Place: Mumbai **Company Secretary &**
Date: 05.02.2021 **Compliance office**

### ENBEE TRADE AND FINANCE LTD.

**CIN No: L50100MH1985PLC036945**
**Regd. Office:** B4/C5, Gods Gift Chs Ltd, N M Joshi Marg, Lower Parel, Mumbai – 400013, Maharashtra
**Ph:** 022-24965566, **Fax:** 022-24965566
**Email Id:** enbeetrade@gmail.com;
**Website:** www.enbeetrade.com

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirement) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Saturday, February 13, 2021 to consider, approve and take on record Un-Audited Standalone Financial Results of the Company for the Quarter ended December 31, 2020.

**For Enbee Trade and Finance Limited**
**Sd/-**
**Amar N. Gala**
**Managing Director**
**Place:** Mumbai. **DIN: 07138963**
**Date:** February 04, 2021

### प्रकाश स्टिलेज लिमिटेड

सीआयएनः एल२७१०६एमएच१९९१पीएलसी०६१५९५
नोंदणी. कार्यालयः१०१, १ ला मजला, शत्रुंजयअपार्टमेंट, २८, सिंधी लेन, नानूभाईदेसाई रोड, मुंबई - ४०० ००४.
ई-मेलःcs@prakashsteelage.comसंकेतस्थळःwww.prakashsteelage.com
दूर. क्र.: ०२२-६६१३४५०० फॅक्स क्र.: ०२२६६१३४५९९

**सूचना**

सूचना द्याद्वारे देण्यात येत आहे की,भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाच्या (लिस्टिंग ऑब्लगेशन्स आणि डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ च्या नियम ४७(१)(ए) सह वाचल्या जाणाऱ्या नियम २९ आणि ३३ च्या अनुषंगाने ३१ डिसेंबर २०२१ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांसाठी कंपनीचा अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्ष अन्य बाबींसह विचार करूनसंमत करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठकशुक्रवार, १२ फेब्रवारी, २०२१ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

उपरोक्त सूचना कंपनीच्या(www.prakashsteelage.com) आणिनॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड च्या(www.nseindia.com) आणि बीएसई लिमिटेड च्या (www.bseindia.com) च्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

प्रकाश स्टिलेज लिमिटेड, करीता
सही/-
प्रकाशसी. कांगो
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः ००२८६३६६

ठिकाणःमुंबई
दिनांकः०५.०२.२०२१

### मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रभाग कार्यालय क्र. 1**

जा. क्र. मनपा/प्र. का.क्र.१/डी/५९/५२८६/२०२०-२१ दिनांक : ०३/०२/२०२०-२१

**// नोटीस //**

मिरा-भाईंदर महानगर पालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र. १ क्षेत्रातील **प्रभू आशीष नं. १**, येथील मा. क्र. **डी ०३०००३६०५०४४/२११** असुन या मालमत्तेतील सदनिका क्रमांक **२११**, ही सदनिका **श्रीम. सुशीलाबेन के. शाह** यांचे नावावर आहे. **श्रीम. सुशीलाबेन के. शाह व कांतीलाल शाह,** यांचा दि. ०२/०९/२०१३ व ११/०४/२००० रोजी मृत्यु झाल्यामुळे वारस या नात्याने त्यांच्या मुलगा **चेतन कांतीलाल शाह** यांनी सदर सदनिका आपल्या नावावर करणे बद्दल दि. २२/०१/२०२१ रोजी लेखी अर्ज करुन मालमत्ता हस्तांतरणाबाबत मागणी केलेली आहे. 'मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिसुचितील प्रकरण ८ मधील कलम १ (२)' नुसार नावात बदल करणेबाबत वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्यांत येत आहे.

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही काही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास १४ दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. ०१ येथे कार्यालयील वेळेत दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

कळावे
नोटीस प्रसिद्ध
दि. ०३/०२/२०२१

**सही/-**
**प्रभाग अधिकारी**
**प्रभाग कार्यालय क्र. ०१**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

### RICHIRICH INVENTURES LIMITED

**CIN-L65990MH1986PLC039163**
Regd Off : A-1 Emperor Court, Ground Floor, Yashwant Nagar, Vakola, Mumbai, Maharashtra, 400055
Tel : (9122) 79664656 email richagro@yahoo.co.in website:www.richirichinventures.com

**STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTH ENDED 31.12.2020** (Rs. In Lakhs except as stated)

| Particulars | Quarter Ended (Un-Audited) | | Nine Month Ended (Unaudited) | Year Ende (Audited ) |
|---|---|---|---|---|
| | 31/12/2020 | 31/12/2019 | 31/12/2020 | 31.03.2020 |
| Total Income from Operations | 2.040 | 4.214 | 9.839 | 15.845 |
| Net Profit / (Loss) for the Period (before Tax,Exceptional and /or Extraordinary items | (1.744) | 0.226 | (2.367) | (4.613) |
| Net Profit / (Loss) for the Period after Tax (after Exceptional and /or Extraordinary items ) | (1.744) | 0.226 | (2.367) | (4.613) |
| Total Comprehensive Income for the period (comprising Profit/Loss) for the period (after tax) and other comprehensive income (after tax) | (1.744) | 0.226 | (2.367) | (4.613) |
| Paid up Equity Share Captial, Equity Share of Rs. 5/- Each. | 240.000 | 240.000 | 240.000 | 240.000 |
| Earnings per share (Face Value Rs. 5) (Not Annualised) | | | | |
| Basic | (0.036) | 0.005 | (0.049) | (0.096) |
| Diluted | - | - | - | - |

**Notes:**

1. The above financial results have been reviewed by the Audit Committee and subsequently approved by the Board of Directors at their meeting held on February 05, 2021.
2. The above is an extract of the detailed formate of the standalone financial Result for the quarter ended 31st December,2020 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Discloser Requirements) Regulations,2015.The full formate of the standalone Financial Result for the quarter ended 31st December,2020 are available on the stock Exchange website (www.bseindia.com) and Company website www.richirichinventures.com.

**Date:05/02/2021**
**Place: Mumbai**

**Sd/- Renu Jain**
**Director**
**DIN-00094290**